MHYA070004652018

दाखल दिनांक	:-	१६/०१/२०१८
नोंदणी दिनांक	:-	१६/०१/२०१८
निर्णय दिनांक	:-	२०/०४/२०२६
कालावधी	:-	०८ व. ०३ म ०४ दि.

दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) दारव्हा जि. यवतमाळ यांचे न्यायालय

(पिठासीन अधिकारी श्री. एस. एस. आरदवाड)

भुसंपादन अर्ज क्रं. १२/२०१८
पुंडलीक-वि. सरकार व ईतर
निशाणी : ३०

पुंडलिक झामाजी राठोड,
वय :- २८ वर्षे, व्यवसाय :- शेती,
रा. भांबोरा, ता. घाटंजी,
जिल्हा यवतमाळ. **...... अर्जदार.**

विरुध्द

१. कार्यकारी अभियंता,
अरुणावती प्रकल्प, दिग्रस,
जि. यवतमाळ.

२. महाराष्ट्र शासन मार्फत
जिल्हाधिकारी, यवतमाळ,
ता. जि. यवतमाळ.

३. विशेष भुसंपादन अधिकारी,
लाभ क्षेत्र, यवतमाळ,
जि. यवतमाळ. **.... गैरअर्जदार.**

दावा :- भुमीसंपादन अधिनियम १८९४ चे कलम १८ नुसार

विधीज्ञ :- १. अर्जदारातर्फे श्री. आर.एस. चौधरी वकील साहेब.

२. गैरअर्जदार क्रमांक १ तर्फे श्री. ए. ए. अलोणे,

३.गैरअर्जदार क्रमांक २ व ३ तर्फे श्री. डी. एम. निमकर,
सहायक सरकारी अभियोक्ता.

न्यायनिर्णय

(दिनांक २०/०४/२०२६ रोजी घोषीत)

. प्रस्तुतचे प्रकरण हे भुमी अधिग्रहण कायदा १८९४ च्या कलम १८ प्रमाणे अर्जदाराने संपादीत जमिनीच्या वाढीव मोबदल्यासाठी दाखल केले आहे.

अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे;

२. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, अर्जदार हा मौजे कुऱ्हा, ता. आर्णी जि. यवतमाळ येथील शेत गट क्र.२१३/२, एकुण क्षेत्रफळ ०१ हेक्टर ३१ आर या शेतजमीनीचे मालक व वहीवाटदार होता. तसेच अर्जदाराच्या संपादीत जमीनीमध्ये एक जांभुळीचे झाड होते. सदर शेतजमीनीपैकी ०० हेक्टर ५४ आर शेतजमीन महाराष्ट्र शासनाने भुसंपादन प्रकरण क्रमांक २७/४७/२००१-०२ अनुसार अरुणावती प्रकल्पाच्या कालव्याच्या बांधकामाकरीता तथा सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादीत केली. या जमिनीस यापुढे '**संपादीत मिळकत**' असे संबोधण्यात येते.

३. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, वर नमुद संपादन प्रक्रीयेत महाराष्ट्र शासनाने गैरअर्जदार क्र.०२ यांच्यामार्फत गैरअर्जदार क्र. ०३ यांची विशेष भुसंपादन अधिकारी म्हणुन नेमणुक केली व गैरअर्जदार क्र. ०१ हे ज्या प्रकल्पासाठी भुसंपादन करण्यात आले त्या प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता आहेत.

४. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, वर नमुद भुसंपादन प्रक्रीयेदरम्यान भुसंपादन अधिकारी यांनी जमिन अधिग्रहणासाठी दिनांक २०/०९/२००१ व शुध्दीपत्रक दि.२८/०२/२००२ रोजी शासकीय राजपत्रात भुसंपादन कायद्याच्या कलम ४ प्रमाणे जाहीर प्रगटन दिले. सदरील अधिग्रहणाची नोटीस 'कर्दनकाळ' या वृत्तपत्रात दिनांक ०७/१०/२००१ रोजी व शुध्दीपत्रक दि.१३/०२/२००२ व दैनिक 'देशोन्नती' या वृत्तपत्रात दि.०८/१०/२००१ रोजी व

शुदीपत्रक, दि.१६/०२/२००२ रोजी प्रकाशित झाली. सदरील नोटीस ग्रामपंचायत यांच्या नोटीस बोर्डवर शेवटी दिनांक २०/११/२००१ रोजी प्रकाशित करण्यात आली.

५. त्यानंतर दिनांक ०६/०६/२००२ रोजी कलम ६ चे जाहीर प्रगटन शासकीय राजपत्रात करण्यात आले. गैरअर्जदार क्र. ३ यांनी त्यानंतर पुढील प्रक्रीयेत योग्य त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करुन दिनांक ०१/०६/२००४ रोजी अंतिम निवाडा पारीत केला. सदरील निवाड्याप्रमाणे अर्जदारांच्या संपादीत मिळकतीस नुकसान भरपाई म्हणुन रुपये ४६,०००/- प्रति हेक्टर या दराने बाजार मुल्य मंजुर करण्यात आले. सदरील रक्कम रुपये ३९,७४४/- अर्जदाराने हरकत ठेवुन स्वीकृत केली व वाढीव मोबदल्यासाठी हे प्रकरण दाखल करुन प्रति एक्कर रुपये ७५,०००/- याप्रमाणे वाढीव मोबदला रक्कमेची मागणी केली.

६. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, गैरअर्जदार क्र.३ यांनी दिनांक ०१/०६/२००४ च्या अंतिम निवाड्याप्रमाणे ठरवलेला मोबदला हा बाजारभावाप्रमाणे योग्य नाही. भुसंपादन अधिकारी यांनी संपादीत जमिनीचे बाजारमुल्य निश्चित करतेवेळी जमिनीची प्रत, सद्यस्थिती, मुख्य रस्त्यापासुनचे अंतर ईत्यादी बाबींची शहनिशा न करता बाजारमुल्य ठरवले. भुसंपादन अधिकारी यांनी वस्तुस्थितीचा विचार न करता शासकीय दर व खरेदीखत यांचा तुलनात्मक अभ्यास करुन अत्यंत कमी मोबदला दिला. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे संपादीत मिळकत ही मौजे कुऱ्हा येथील असुन कुऱ्हा हे गाव आर्णी शहरापासुन ०५ कि.मी. अंतरावर आहे. मौजे कुऱ्हा हे एकूण २००० लोकसंख्या असून तेथे स्वतंत्र ग्रामपंचायत असुन तेथे शैक्षणीक सुविधा उपलब्ध आहेत. तसेच संपादीत शेतजमीन ही राज्य महामार्गाच्या जवळ असल्यामुळे सदरील गावातील जमिनीचे बाजारमुल्य जास्त आहे. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे संपादीत मिळकत ही काळी कसदार व ओलीताची अशी समृध्द

स्वरुपाची होती व त्यामधुन ते तुर, कापुस, ज्वारी, सोयाबीन, ईत्यादी पिके घेऊन अर्जदार हे दरवर्षी साधारणतः १० ते १२ हजार रुपये प्रति एकर निव्वळ नफा कमवायचे. गैरअर्जदार यांनी ठरवलेले संपादीत जमिनीचे बाजारमुल्य हे अत्यंल्प असुन ते अर्जदाराने मान्य केले नाही व अतिरीक्त मोबदला, दिलासा रक्कम कायद्याप्रमाणे मिळावी, हि विनंती न्यायालयाला केली आहे.

<u>गैरअर्जदारांचे कथन खालीलप्रमाणे;</u>

७. गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी निशाणी क्रमांक १० प्रमाणे आपला लेखी जबाब अभिलेखावर दाखल केला. तसेच गैरअर्जदार क्र.१ यांनी पुरसिस नि.क्र.१४ अन्वये दाखल करुन, गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी दाखल केलेला लेखी जबाब स्विकार करण्याचे कथन केले. गैरअर्जदारांचे असे कथन आहे की, सदरील अर्ज हा मुदतीत दाखल नाही. भुसंपादन अधिकारी यांनी अर्जदाराच्या संपादीत जमिनीचे योग्य ते मुल्यांकन केले आहे. अर्जदाराने वाढीव मोबदल्याकामी कुठलाही सबळ पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. अर्जदाराने वाढीव बाजारमुल्याबाबत भुसंपादन अधिकारी यांच्या समोर योग्य तो कागदोपत्री पुरावा दिला नाही. अर्जदार हे जमिनीची प्रत, शहरापासुनचे अंतर व इतर बाबी हया खोटेपणाने वाढीव मोबदला मिळावा म्हणुन कथन करीत आहेत. शासनाने अर्जदारास योग्य तो मोबदला यापुर्वीच दिलेला आहे. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज फेटाळण्यात यावा.

८. माझे पुर्व अधिकारी यांनी दोन्ही बाजुंचे म्हणणे लक्षात घेऊन नि. क्र. ११ प्रमाणे मुद्दे निश्चिती केले. सदरील मुद्यावर मी माझे निष्कर्ष कारणासह खालीलप्रमाणे देत आहे;

अ. क्र.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१.	अर्जदार असे सिध्द करतो का की, भुसंपादन	.........होय.

	अधिकारी यांनी दिलेली संपादीत जमिनीचा मोबदला रक्कम ही कलम ४ च्या अधिसुचनेच्या वेळी अपुरी असुन बाजार भावाप्रमाणे नाही?	
२.	वाढीव नुकसान भरपाई मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय? असल्यास, कितपत?	.......अंशतः होय.
३.	आदेश आणि हुकूमनामा?	.........अंतिम आदेशाप्रमाणे.

कारणमिमांसा

९. अर्जदाराने आपल्या कथनाच्या समर्थनात तोंडी व कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे. त्यामध्ये अर्जदाराने आपले पुराव्याचे शपथपत्र नि. क्र.१९ प्रमाणे दाखल केले आहे. अर्जदारातर्फे इतर कोणताही तोंडी पुरावा दाखल करण्यात आला नाही. कागदोपत्री पुराव्यात अर्जदारातर्फे अंतिम निवाड्याची प्रमाणीत प्रत नि. २० प्रमाणे, भुसंपादन कायद्याच्या कलम १२(२) ची नोटीस नि. २१ प्रमाणे, खरेदीखत क्र.३५७/१९८८ ची प्रमाणीत प्रत नि.क्र.२२ प्रमाणे, गट क्र.२१३/२, मौजा कुऱ्हा सन १९९९ ते २०१० च्या ७/१२ उताऱ्याची प्रमाणीत प्रत नि.क्र.२५ प्रमाणे, भुसंपादन मामला क्र.०३/२००७ मधील न्यायनिर्णयाची संगणकीय प्रत नि.क्र.२६ प्रमाणे दाखल करण्यात आली. अर्जदाराचा पुरावा नि. क्र. २७ वरील पुरसिस प्रमाणे बंद करण्यात आला.

१०. गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांच्यातर्फे कुठलाही तोंडी किंवा लेखी पुरावा दाखल करण्यात आला नाही. तसेच त्यांचा पुरावा नि.क्र.२८ व २९ वरील पुरसिस प्रमाणे बंद करण्यात आला.

११. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. त्यांचा युक्तीवाद हा अर्ज व लेखी जबाब यांच्या प्रमाणे आहे.

<u>मुद्दा क्र. १ व २ करीता :-</u>

१२. अर्जदार यांनी दाखल केलेला पुरावा व कागदपत्राचे अवलोकन केले असता, असे आढळुन येते की, अर्जदाराची मालकीची मौजे कुऱ्हा येथे गट नं. २१३/२ मध्ये १ हेक्टर ३१ आर शेतजमिन होती. त्यापैकी ०० हेक्टर ५४ आर. शेतजमिन महाराष्ट्र शासनाने गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांच्यामार्फत अरुणावती प्रकल्पाच्या कालव्याच्या बांधकामाकरीता दिनांक २०/०९/२००१ च्या राजपत्रीत अधिसुचनेद्वारे संपादीत केली. याबाबत दोन्ही पक्षात वाद नाही. या संबधी गैरअर्जदार क्र. ३ यांनी पारीत केलेला निवाडा अभिलेखावर नि. क्र.२० प्रमाणे दाखल आहे.

१३. अर्जदार पुंडलिक या साक्षीदाराने आपल्या तोंडी पुराव्यात हे सिध्द करण्याचा प्रयत्न केला आहे की, संपादीत जमिन ही उच्च प्रतीची व ओलीताची होती व त्यामुळे दिलेला मोबदला हा पर्याप्त नाही. त्या अनुषंगाने वर नमुद निवाड्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, संपादीत जमिन ही जिरायत स्वरुपाची होती व तसा उल्लेख नि.२५ वरील सातबारा उताऱ्यात आहे. तसेच अर्जदाराने त्याच्या उलटतपासा दरम्यान स्पष्टपणे कबुल केले की, संपादनाच्या वेळी संपादीत मिळकत ही कोरडवाहू स्वरुपाची होती. तसेच अर्जदाराच्या नि.क्र.१ वरील अर्जामध्ये देखील संपादनाच्या वेळी संपादीत मिळकतीमध्ये सिंचनाची सुविधा असल्याबाबत कथन केलेले नाही. त्यामुळे वरील नमूद कारणमिमांसेवरुन हे स्पष्ट होते की, अर्जदाराची संपादीत शेतजमीन ही जिरायती स्वरुपाची होती. करीता सदरील संपादीत जिरायत जमीनीसाठी भुसंपादन अधिकारी यांनी प्रति हेक्टर रुपये ४६,०००/- इतके बाजारमुल्य ठरवले होते. अर्जदाराला आपल्या संपादीत ०० हेक्टर ५४ आर जमिनीचे व्याजासहीत व दिलाश्यासहीत एकूण बाजारमुल्य रक्कम रुपये ३९,७४४/- असे ठरविण्यात आले होते. सदर रक्कम अर्जदाराने हरकत घेऊन स्वीकृत केली होती.

१४. या प्रकरणात अर्जदाराने त्यांचे कथनाच्या पृष्ठ्यर्थ मौजा चिकणी येथील, दि.२१/११/१९८८ रोजीचे खरेदीखत नि. क्र. २२ प्रमाणे दाखल केले आहे. संपादीत जमीन ही मौजे कुऱ्हा, ता. आर्णी येथील आहे तर नमुद खरेदी खतातील मालमत्ता ही मौजे आर्णी प्र. चिकनी, ता. दिग्रस, जि. यवतमाळ येथील आहे. संपादीत मिळकत व खरेदीखत नि.क्र.२२ वरील मिळकती या भिन्न ठिकाणच्या असल्यामुळे वर नमुद खरेदीखतावरुन अर्जदाराच्या संपादीत मिळकतीचे मुल्यांकन होणे शक्य नाही. करीता नि. क्र.२२ वरील खरेदीखताचा मुल्यांकनाकरीता विचार करता येणार नाही.

१५. अर्जदाराने संपादीत मिळकतीचे मुल्यांकनाकरीता ईतर कागदोपत्री पुरावा तुलनात्मक अभ्यासासाठी किंवा संपादीत मिळकतीचा बाजारभाव ठरविण्यासाठी दाखल केले नाहीत. पुढे अर्जदारानी नि.क्र. २६ प्रमाणे भुसंपादन मामला क्र.०३/२००७ मधील न्यायनिर्णयाची संगणकीय प्रत दाखल केली असुन त्यावर अर्जदाराची संपुर्ण भिस्त आहे. अर्जदाराच्या कथना प्रमाणे सदरील प्रकरणातील न्यायनिर्णय हे या प्रकरणात बाजारमुल्य ठरविण्यासाठी विचारात घेण्यात यावा.

१६. यानुसार मी या प्रकरणात संपादीत जमीनीचे बाजारमुल्य ठरविण्यासाठी अर्जदाराने दाखल केलेल्या भुसंपादन मामला क्र.०३/२००७ मधील नि.क्र.२६ वरील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता सदरील न्यायनिर्णयाच्या सत्यतेबाबत वाद नाही. तसेच सदरील न्यायनिर्णय वरीष्ठ न्यायालयाने रद्द केल्याचे किंवा दुरुस्त केल्याचे माझ्या निदर्शनास दोन्ही बाजुंनी आणले नाही. वर नमुद न्यायनिर्णयाची संगणकीय प्रत नि. २६ प्रमाणे आहे. सदरील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसते की, सदरील न्यायनिर्णय हे भुसंपादन मामला क्र. २७/४७/२००१-०२ या भुसंपादन प्रकरणातील असून सदरील प्रकरण हे कुऱ्हा

गावातील अरुणावती प्रकल्पाच्या कालव्याच्या बांधकामाशी संबंधीत आहे. सदरील न्यायनिर्णयातील प्रकरणात भुसंपादन प्रक्रिया ही कुऱ्हा, ता. आर्णी या गावातील गट क्र.२१३/३ या शेतजमीनींच्या संपादनाशी निगडीत आहे.

१७. वर नमुद परीस्थितीचा विचार करता भुसंपादन मामला क्र.०३/२००७ या प्रकरणातील न्यायनिर्णय हे मौजा कुऱ्हा गावातील म्हणजेच या प्रकरणातील एकाच म्हणजेच अरुणावती प्रकल्पाशी संबंधीत असुन सदरील न्यायनिर्णयातील संपादीत शेतजमीन व या प्रकरणातील संपादीत जमीन ही कुऱ्हा या एकाच गावची आहे. तसेच सदरील प्रकरणातील शेतजमीनी व या प्रकरणातील शेतजमीन हया अरुणावती प्रकल्पांतर्गत एकाच सार्वजनिक कामाकरीता, एकाच कालावधीमध्ये समान हेतुकरीता एकाच अधिसुचनेंतर्गत संपादीत झालेल्या आहेत. सदरील न्यायनिर्णयातील शेतजमीन व हातातील प्रकरणातील संपादीत शेतजमीन, हया जिरायती स्वरुपाच्या आहेत.

१८. भुसंपादन मामला क्र.०३/२००७ या प्रकरणातील संपादीत शेतजमीनीला शासनाने प्रति हेक्टर रुपये ३८,५००/- इतका मोबदला मंजूर केला होता. भुसंपादन मामला क्र.०३/२००७ मधील दिनांक १४/०३/२०२४ च्या न्यायनिर्णयाप्रमाणे विद्यमान न्यायालयाने सदरील मोबदला रक्कम वाढवुन रुपये १,५३,०००/- प्रति हेक्टर एवढा वाढीव मोबदला दिला आहे. यामुळे भुसंपादन मामला क्र.०३/२००७ या प्रकरणातील न्यायनिर्णय हे प्रस्तुत प्रकरणातील वाढीव मोबदला ठरवितांना ग्राह्य धरता येईल.

१९. करिता, भुसंपादन मामला क्र.०३/२००७ या प्रकरणातील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता, संपादीत जमीनीसाठी विद्यमान न्यायालयाने प्रति हेक्टर रुपये १,५३,०००/- एवढे बाजारमुल्य ठरविले आहे. तसेच भुसंपादन

मामला क्र.०३/२००७ या प्रकरणामधील शेतजमीन ही, दि.०१/०६/२००४ रोजीच्या अवार्डनुसार संपादीत झाली असुन कलम ४ ची अधिसूचना दि.०७/१०/२००१ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. या प्रकरणातील शेतजमीन ही सुध्दा, दि. ०१/०६/२००४ रोजीच्या अवार्डनुसार संपादीत झाली असुन कलम ४ ची अधिसूचना देखील, दि. ०७/१०/२००१ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. म्हणजेच वरील दाखल न्यायनिर्णयातील शेतजमीन व सदर प्रकरणातील शेतजमीन ही एकाच अधिसुचनेनुसार, एकाच प्रकल्पाकरीता, एकाच समान उद्देशाकरीता संपादीत झाल्या आहेत. त्यामुळे वर नमुद वरील न्यायनिर्णयानुसार अर्जदाराच्या संपादीत शेतजमीनीचे मुल्य ठरविणे संयुक्त ठरेल. वर नमुद बाबी विचारात घेता, या प्रकरणातील जमीनीचे बाजारमुल्य हे प्रती हेक्टरी रुपये १,५३,०००/- एवढे ठरते. करिता, या प्रकरणात अर्जदार हा त्यांच्या संपादीत ०.५४ आर जिरायती मिळकतीसाठी रुपये १,५३,०००/- प्रति हेक्टर प्रमाणे वाढीव मोबदला मिळण्यास पात्र आहे.

२०. अर्जदाराच्या संपादीत जमीनीसाठी वर नमुद प्रमाणे रुपये १,५३,०००/- प्रति हेक्टर प्रमाणे वाढीव मोबदला ठरविल्यानंतर सदरील वाढीव मोबदला भुसंपादन कायद्याच्या कलम ४ व २३(१अ) प्रमाणे शेवटची अधिसुचना ज्या दिवशी निर्गमित करण्यात आली त्या दिवशी पासुन देय ठरते. या ठिकाणी शेवटची अधिसुचना ही नि. क्र. २० वरील अवार्ड प्रमाणे ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दिनांक २०/११/२००१ रोजी प्रसिध्द करण्यात आली. करीता मोबदला देताना शेवटची अधिसुचना दिनांक **२०/११/२००१** ग्राहय धरावी लागेल.

२१. वरील सर्व विवेचनाला अनुसरुन मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी असे नोंदवले व मुद्दा क्र.२ चे उत्तर अंशतः होकारार्थी असे नोंदवले.

<u>मुद्दा क्र. ३ करीता :-</u>

२२. वर नमुद सर्व कारणमिमांसेनंतर अर्जदाराला देण्यात येणाऱ्या मोबदला रक्कमेचा ऊहापोह करणे याठिकाणी उचित ठरेल. उपलब्ध कागदपत्रानुसार अर्जदाराला त्याची गट नं. २१३/२ मधील ०० हेक्टर ५४ आर. जमिन संपादीत करताना भुसंपादन अधिकारी यांनी प्रति हेक्टरी ४६,०००/- रुपये एवढा मोबदला निश्चित केला होता. त्याप्रमाणे अर्जदाराला त्यांच्या संपादीत ०० हेक्टर ५४ आर जमिनीसाठी व्याज व दिलाश्यासह रुपये ३९,७४४/- रूपये मंजुर झाले. अर्जदाराने प्रति हेक्टरी रुपये १,८७,५००/- ऐवढा मोबदला मागितला आहे. परंतु वर नमुद कारणमिंमासा भुसंपादन मामला क्र.०३/२००७ मधील वरील न्यायनिर्णयाच्या अधिन राहुन वर नमुद प्रमाणे अर्जदार हा रुपये १,५३,०००/- प्रति हेक्टर प्रमाणे मोबदला रक्कम मिळण्यास पात्र आहे. तसेच भुसंपादन कायद्याच्या कलम २३ व २८ नुसार वाढीव मोबदल्यावर नियमाप्रमाणे अतिरीक्त मोबदला, दिलासा रक्कम आणि व्याज मिळण्यास अर्जदार पात्र आहे. सबब मुददा क्रं. ३ च्या उत्तरात हा अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो;

<u>आदेश</u>

(१) अर्ज/भुसपांदन प्रकरण खर्चासह अंशतः मंजुर करण्यात येतो.

(२) गैरअर्जदारांनी अर्जदाराला भुसंपादन प्रकरण क्रं. २७/४७/२००१–०२ मधील मौजा कुऱ्हा, ता. आर्णी, जि. यवतमाळ येथील गट क्रं. २१३/२ मधील ०० हेक्टर ५४ आर संपादीत मिळकतीसाठी रक्कम रुपये १,५३,०००/– (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष त्रेपन्न हजार फक्त) प्रति हेक्टर प्रमाणे वाढीव मोबदला द्यावा. यामध्ये यापुर्वी अर्जदाराला देण्यात आलेली मोबदला रक्कम वजा करण्यात यावी.

(३) गैरअर्जदारांनी अर्जदाराला भुसंपादन कायद्याच्या कलम २३(१) नुसार कलम ४(१) च्या शेवटच्या अधिसुचनेच्या म्हणजेच दिनांक २०/११/२००१ पासुन ते निवाडा/अवार्ड च्या तारखेपर्यत म्हणजेच दिनांक ०१/०६/२००४ पर्यंत दरसाल **१२** टक्के दराने अतिरीक्त मोबदला/मुल्य द्यावे आणि भुसंपादन कायद्याच्या कलम २३(२) प्रमाणे वाढीव मोबदल्यावर **३०** टक्के दिलासा रक्कम द्यावी.

(४) गैरअर्जदारांनी अर्जदाराला वाढीव मोबदला, अतिरीक्त मोबदला आणि दिलासा रक्कमेवर निवाडा/अवार्डच्या तारखेपासुन म्हणजेच दिनांक ०१/०६/२००४ पासुन एक वर्षापर्यंत दरसाल **०९** टक्के दराने व्याज द्यावे व त्यानंतरच्या कालावधीसाठी अर्जदाराला संपुर्ण रक्कम मिळेपर्यंत दरसाल **१५** टक्के दराने व्याज द्यावे.

(५) अर्जदाराला मिळालेल्या वाढीव मोबदल्यावर/रक्कमेवर या आधी न्यायालयीन शुल्क भरले नसल्यास ते आजपासुन तीस दिवसाच्या आत न्यायालयात जमा करावे.

(६) येणेप्रमाणे खर्चाचे देयक तयार करण्यात यावे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.

Digitally signed by SACHIN SURENDRA ARADWAD
Date: 2026.04.20 11:37:11 +0530

दिनांकः-२०/०४/२०२६. (एस. एस. आरदवाड)
दारव्हा जि. यवतमाळ. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, दारव्हा.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/order are same word for word as per original Judgment/order.

Name of Stenographer	R.H. Lokhande (Grade-II)
Court Name	Shri. S. S. Aradwad, Civil Judge Sr.Dn., Darwha, Dist. Yavatmal.
Date of Judgment/order	20-04-2026
Judgment/order signed by Presiding Officer on	20-04-2026
Judgment/order uploaded on	20-04-2026